महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ११६ वे | दिनांक : २१/०४/२०२६ | वार मंगळवार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'माझे समकक्ष' म्हटलेय : डीबेटच्या आव्हानावरून चित्रा वाघ यांचे सुप्रिया सुळेंना प्रत्युत्तर



**मुंबई** : महिला विधेयकावरून सध्या सरकार आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. तसेच आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत महिला आरक्षण विधेयकाच्या मुद्यांवरून विरोधकांच्या प्रश्नांचे उत्तरे दिली असून जोरदार हल्लाबोलही केला. तसेच त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी डीबेटसाठी तयार असल्याचे म्हटले होते. यावरून आता भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी टीका केली आहे.

चित्रा वाघ म्हणाल्या, मला असे वाटतेय बारामतीच्या मोठ्या ताई त्यांनी म्हटले आहे की मी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत डीबेट करायला तयार आहे. ताईंनी जितके प्रश्न उपस्थित केले त्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच दिले आहेत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे देवेंद्रजींनी त्यात म्हटले आहे की माझे समकक्ष जे नेते असतील त्यांच्यासोबत मी डीबेट करायला तयार आहे. म्हणजे पवार साहेब यांनी जर विनंती केली आणि ते तयार असतील तर निश्चितपणे राज्याचे मुख्यमंत्री हे माननीय पवार साहेबांसोबत डीबेट करतील, असे म्हणत वाघ यांनी सुप्रिया सुळे यांना टोला लगावला आहे.

कॉंग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी देखील महिला विधेयकाला विरोध केला. त्यावर बोलताना चित्रा वाघ म्हणाल्या, दुर्दैव आहे की ज्या महिलांनी, ज्या महिला खासदारांनी विरोध केला, या सगळ्या कुठल्या न कुठल्या राजकीय पार्श्वभूमीच्या महिला आहेत. कोणाचे वडील आहेत, कोणाचा पती आहे, कोणाचा भाऊ आहे. आज या 33 टक्क्यांची आवश्यकता होती, ज्यासाठी मोदीजींचा प्रयत्न आहे की सर्वसाधारण ज्यांच्या मागे कुठल्याही राजकारणाचा इतिहास भूगोल नाही, अशा महिला संसदेतही येणार होत्या आणि देशाच्या प्रत्येक विधानसभेतही येणार होत्या.

पुढे बोलताना चित्रा वाघ म्हणाल्या, इतक्या महिलांनी जे स्वप्न पाहिले होते, त्याचा चक्काचूर करण्याचे काम यांनी केले आहे. आणि त्यात महिला खासदार ज्या त्या ठिकाणी आहेत, त्यांचाही समावेश आहे, हे दुर्दैव आहे. जल्लोष केला गेला हे आणखी दुर्दैव आहे. मला त्यांना सांगायचे आहे की नक्की जल्लोष कराच तुम्ही, आता देशातल्या आणि राज्यातल्या महिलांचा शंखनाद तुम्हाला ऐकायला येईल, तो शंखनाद तुम्हाला स्वस्थ बसू देणार नाही.

चित्रा वाघ म्हणाल्या, संसदेत इतक्या सध्या सोप्या भाषेत हे बिल समजावले आहे, या बिलावर जे काही आक्षेप होते ते सुद्धा सर्वसामान्य लोकांना समजेल अशा भाषेत त्याचे निरासण करण्यात आले आहे. असे असून सुद्धा जर सभागृहात बसलेल्या महिला प्रश्न विचारात असतील तर मोठे प्रश्नचिन्ह त्यांच्यावरच आहे.

## 'महिलांच्या हक्कांवर कॉंग्रेसचा घाव': शिवसेना शिंदे गटाचा एल्गार,




**मुंबई** : लोकसभेत शुक्रवारी (दि.१७ एप्रिल) महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करणारे विधेयक (१३१ वी घटनादुरुस्ती) मतदानानंतर नामंजूर झाली. या मतदानात एनडीए दोन-तृतीयांश बहुमत मिळवण्यात अपयशी ठरली. या विधेयकाच्या बाजूने २९८ मते पडली, तर २३० मते विरोधात पडली. त्यानंतर महिला आरक्षण विधेयकावरून सरकारने विरोधकांवर जोरदार टीका करण्यास सुरुवात केली आहे.

१८ एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील देशाला संबोधित करताना कॉंग्रेस आणि विरोधकांवर भ्रूणहत्या केल्याचा आरोप करत जोरदार टीका केली होती. आता मुंबईच्या वर्सोवा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाकडून देखील कॉंग्रेसच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली आहे.

'महिलांच्या हक्कांवर कॉंग्रेसचा घाव' असे म्हणत शिवसेना शिंदे गटाने संजय निरुपम यांच्या नेतृत्वात जोरदार घोषणाबाजी केली आहे. तसेच हे आकडे फक्त मतदान नाही तर कॉंग्रेसची महिला विरोधी असणारी खरी मानसिकता आहे. नारी शक्ती वंदन अधिनियमाला विरोध म्हणजे महिलांच्या सशक्तीकरणालाच नकार, अशी टीका शिंदे गटाने केली आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करताना म्हटले की, देशातील कोट्यवधी महिलांची नजर संसदेकडे लागलेली होती. नारी शक्तीचा हा प्रस्ताव जेव्हा फेटाळला गेला, तेव्हा काँग्रेस, सपा, टीएमसी, डीएमके सारख्या घराणेशाही पक्षांनी आनंद साजरा केला, हे पाहून मला दु:ख झाले. वैयक्तिकरित्या मला अपेक्षा होती की आपली दशकांपूर्वीची चूक सुधारेल आणि पापांचे प्रायश्चित्त करेल. पण काँग्रेसने इतिहास घडवण्याची आणि महिलांच्या पाठीशी उभे राहण्याची संधी गमावली, अशी टीका मोदींनी केली होती.दरम्यान, केंद्र सरकारच्या कायदा मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, १६ एप्रिल २०२६ पासून 'महिला आरक्षण कायदा २०२३' लागू झाला असून त्याद्वारे संसद आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. तथापि, प्रस्तावित १३१ व्या घटनादुरुस्ती विधेयक २०२६ नुसार हे आरक्षण मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतर (डिलिमिटेशन) लागू करण्याचे सरकारने प्रस्तावित केल्यामुळे विरोधकांनी यावर तीव्र आक्षेप घेतला असून, हे आरक्षण भविष्यातील वाढीव जागांच्या निकषावर नव्हे, तर लोकसभेच्या विद्यमान ५४३ जागांवरच तत्काळ लागू करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## भाजपचे स्वीकृत सदस्य जाहीर : पाच नावांवर शिक्कामोर्तब

**छत्रपती संभाजीनगर** : महापालिकेतील स्वीकृत सदस्यांच्या निवडीवर अखेर पडदा पडला असून भाजपने आपल्या कोट्यातील पाच नावांवर अंतिम शिक्कामोर्तब केले आहे. शहराध्यक्ष किशोर शितोळे यांनी यासंदर्भात अधिकृत पत्र महापालिका प्रशासनाला दिल्यानंतर या प्रक्रियेला वेग आला. प्रदेश भाजपकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर ही नावे निश्चित करण्यात आली. यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.भाजपकडून स्वीकृत सदस्यपदासाठी मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होती. त्यामुळे पक्षाने आधी १२ जणांची यादी महापालिका प्रशासनाकडे सादर केली होती. या यादीतून अंतिम ५ सदस्यांची निवड करण्यात आली. अधिकृत पत्रानुसार हरवर्धन कराड, छाया खाजेकर, गोकुळ मलके, विजय सिंह झाला आणि अमृता पालोदकर यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या नावांवर पक्षाने अखेर शिक्कामोर्तब केल्याने आता पुढील प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

या प्रक्रियेदरम्यान भाजपने सामाजिक समतोल साधण्यावर विशेष भर दिल्याचे दिसून आले. विविध समाजघटकांना प्रतिनिधित्व मिळावे यासाठी अंतिम निवड करताना काळजी घेण्यात आली. पक्षाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विविध स्तरांवरील प्रतिनिधित्व लक्षात घेऊनच ही यादी तयार करण्यात आली आहे. त्यामुळे पक्षातील अंतर्गत संतुलन राखण्याचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतो.

दरम्यान, स्वीकृत सदस्यांची नावे थेट सर्वसाधारण सभेत जाहीर करण्याची तयारी होती. मात्र, प्रदेशाकडून पत्र उशिरा मिळाल्यामुळे ही प्रक्रिया थोडी विलंबित झाली होती. शहराध्यक्ष किशोर शितोळे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, अंतिम पत्र मिळाल्यानंतरच अधिकृत घोषणा करण्यात आली. त्यामुळे आता प्रशासनाकडे अंतिम नावे सादर झाल्याने औपचारिक घोषणा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या निवड प्रक्रियेत एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नाराज गटाची भूमिका होती. मनपा निवडणुकीत उमेदवारी न मिळाल्यामुळे काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. काहींनी उपोषण, आंदोलन करत पक्षावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, पक्षाने स्पष्ट भूमिका घेत अशा प्रकारे दबाव टाकणाऱ्यांना संधी दिली जाणार नाही, असा निर्णय घेतला. त्यामुळे स्वीकृत सदस्यांच्या यादीत अशा व्यक्तींना स्थान देण्यात आलेले नाही.

एकूणच, भाजपने स्वीकृत सदस्यांच्या निवडीत रणनीती आणि संतुलन यांचा मेळ साधण्याचा प्रयत्न केला आहे. इच्छुकांची संख्या मोठी असतानाही मर्यादित जागांमध्ये योग्य उमेदवारांची निवड करत पक्षाने अंतर्गत असंतोष कमी करण्याचा प्रयत्न केला. आता या नव्या सदस्यांवर महापालिकेच्या कामकाजात सक्रिय भूमिका बजावण्याची जबाबदारी असेल..

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ एप्रिल २०२६


## केंद्रीय विद्यालयात मुलींच्या विभागीय हँडबॉल क्रीडा स्पर्धांना उत्साहात शुभारंभ



**नाशिक रोड (प्रतिनिधी),** शहरातील तोफखाना केंद्र परिसरातील पीएमश्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प येथे मुलींच्या विभागीय हँडबॉल स्पर्धांना सोमवारी सकाळी उत्साहात शुभारंभ करण्यात आला. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातून मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक तसेच गोवा राज्यातील विविध वयोगटातील विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. या स्पर्धा 20 एप्रिल पासून 25 एप्रिल पर्यंत आठवडाभर चालणार आहेत. स्पर्धांच्या सुरुवातीस उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा क्रीडा अधिकारी रविन्द्र नाईक यांची उपस्थिति होती. त्यांनी क्रिडा मंत्र्यांचे विशेष कर्तव्य अधिकारी म्हणून देखील कार्य केलेले आहे. ते एशियन गेम्सच्या समितीत सक्रिय सदस्यपदी होते व भारतीय ऑलंपिक समितीत ही होते. त्यांनी विविध राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन देखील केलेले असून नाशिकला चॉकबॉल या अनोख्या खेळाची ओळख व सुरुवात करण्याचे श्रेय ही रविंद्र नाईक यांना जाते. प्राचार्य गजराज मीना यांनी पुष्पगुच्छ देवून पाहुण्यांचे स्वागत केले. शाळेच्या यशस्वी व्यवस्थापनामुळे मुंबई विभागीय हँडबॉल स्पर्धांसाठी मागील तीन वर्षापासून सातत्याने नासिक रोड कॅम्प केंद्रीय विद्यालयास आयोजक म्हणून संधी मिळत असल्याची माहिती मीना यांनी दिली. शाळेतील माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गायले तर मुलींच्या सांस्कृतिक नृत्य प्रस्तुतीने उपस्थितांत उत्साह भरला. आरीफ बेग यांनी कार्यक्रमाचे संचलन केले. क्रीडा शिक्षिका कल्पना शिंदे यांनी विविध स्पर्धा आणि सर्व नियोजनाची माहिती दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणात रविंद्र नाईक यांनी खेळाडूंना शिस्त, मेहनत आणि सातत्याचे महत्त्व पटवून दिले. मुलांनी मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्याकडे अधिक लक्ष देत सातत्याने खेळाचा सराव करत रहावे. मोबाईल गेम पेक्षा मैदानी गेममध्ये गुंग व्हावे, असे मार्गदर्शन केले. शाळेने राज्य सरकारच्या काही योजनांचा उपयोग करून घेण्याचे आवाहन ही त्यांनी केले. यावेळी नागपूर येथील अनुभवी क्रीडा शिक्षक प्रशिक्षिका डॉ. लवनीत रंधावा यांची पूर्णवेळ विशेष उपस्थिति असणार आहे.

स्पर्धांना परीक्षक म्हणून नाशिक जिल्हा हँडबॉल असोसिएशनचे सूरज कातड, मयूर इष्टे, कामिनी केवट, कांचन जाधव, हर्षिता पाटील, चैताली धात्रक हे कार्य करणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आरीफ बेग, ओंकार काकुस्ते, अविनाश पवार, शुभम यादव, अरविंद लोखंडे आदींसह खेळाडू विद्यार्थ्यांनी योगदान दिले.

## महामानवांचे विचार समजून घ्यायचे असतील तर त्यांच्या ग्रंथांचा अभ्यास आवश्यक - डॉ. संजय गायकवाड



**छत्रपती संभाजीनगर :** महामानवांनी केवळ स्वतःच्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण राष्ट्रकुटुंबासाठी आपले आयुष्य समर्पित केले आहे. त्यांच्या विचारांचा वारसा हा राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे महामानवांना खऱ्या अर्थाने समजून घ्यायचे असेल, तर त्यांच्या विचारसंपदेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांच्या ग्रंथांचा आधार घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक व व्याख्याते डॉ. संजय गायकवाड यांनी केले.

भूवी आनंदबन सोसायटी, गांधीली परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त "राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर : समाज परिवर्तनाचे दीपस्तंभ" या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यंदा या उपक्रमाचे हे दहावे वर्ष होते.

यावेळी संत कबीर यांच्या "मोको कहाँ ढूंढे बंदे..." या दोह्याचा संदर्भ देत डॉ. गायकवाड यांनी सांगितले की, सत्य आणि मूल्ये बाह्य दिखाव्यात नसून ती अंतर्मनातील चिंतनात सापडतात. महामानवांचे विचार केवळ सोशल मीडियावर किंवा प्रतिमांमध्ये मर्यादित नसून ते त्यांच्या ग्रंथांमध्ये अधिक सखोलपणे अनुभवता येतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

महामानवांची जयंती साजरी करताना केवळ औपचारिकता न ठेवता त्यांच्या विचारांचे वाचन आणि आचरण यांचा समतोल साधणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामप्रसाद मापारी होते, तर सचिव म्हणून गोविंद राख यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुनील डोके यांनी केले. आभार प्रदर्शन अश्रुबा गवळी यांनी केले. या व्याख्यानाला सोसायटीतील व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामनाथ इथापे, सुरेश बनसोडे, अमोल काळे, प्रशांत जोशी, अनिल गणगे, सुरेश अंभोरे तसेच सोसायटीतील सर्व सदस्यांनी सहकार्य केले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903



दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ एप्रिल २०२६


## डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू.एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात जागतिक ज्ञान दिन आणि जयंती सप्ताहाचे आयोजन



**नागपूर (चंद्रशेखर पाटील) :** स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, कामठी रोड येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयात 11 एप्रिल ते 20 एप्रिल 2026 असा महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. यानिमित्य क्रांतिसूर्याप्रति कृतज्ञता, राज्य घटना शिल्पकाराची राष्ट्र निष्ठा आणि आधुनिक भारत निर्मात्याचा त्याग आणि अतुल्य बलिदान यांची महत्ता प्रतिबिंबित आणि प्रतिध्वनीत करणारे विविध बौद्धीक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. 11 एप्रिल ला क्रांती ज्योती महात्मा फुले यांच्या जयंती निमित्य समर्पण माजी विद्यार्थी सामाजिक संस्था आणि महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय संविधान, महासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन कार्य या विषयावर सामाजिक जाणीव प्रश्न मंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. यामध्ये महाविद्यालय आणि इतर संस्थेच्या 80 पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला. या जयंती सप्ताहात 12 एप्रिल 2026 ला सकाळी 7 ते संध्याकाळ 7 असा सलग 12 अध्ययन आणि ज्ञानसाधना करून निरंतर अध्ययन उपक्रमातून ज्ञानाच्या अथांग महासागरास भावपूर्ण आदरांजली वाहिली. या बौद्धिक उपक्रमात 100 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयीन ग्रंथालयात हा अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला. विश्व रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्य भीम पहाट स्वरांजली चे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे वाणिज्य विभागातील माजी प्राध्यापक डॉ. नरेंद्र बागडे यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित आयोजन करण्यात आले. स्वरांजली आणि अभिवादन कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे होत्या. सर्व प्रथम सर्व मान्यवरांनी प्रज्ञासूर्यास आदरांजली वाहिली. स्वरांजली ची सुरुवात संगीत विभागा प्रा. प्रज्ञा कोचे यांनी गायिलेल्या बुद्ध वंदनेने झाली. भीम पहाट च्या माध्यमातून डॉ. महेंद्र गायकवाड यांनी आपल्या सुरातून भीमरायास श्रद्धांजली वाहिली. प्रमुख अतिथी डॉ. नरेंद्र बागडे यांनी सादर केलेल्या सुरेश भट रचित " भीम राया घे तूझ्या या लेकरांची वंदना " या भावगर्भ गीताने आसमंत भारावून टाकला. भीम स्वरांजली मध्ये माजी विद्यार्थी गजानन पानतावणे, प्रा. प्रज्ञा कोचे, गोपी गोस्वामी यांनी देखील आपल्या गीतांमधून महा सूर्यास अभिवादन केले. भीम स्वरांजली चे संचालन डॉ. कमलाकर तागडे आणि डॉ. रागिणी चौधरी यांनी केले. 16 एप्रिल ला कामठी रोड स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कंवेन्शन सेंटर येथे अभ्यास भेट आयोजित करण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील बहुसंख्येने विद्यार्थी आणि प्राध्यापक सहभागी झाले होते. 20 एप्रिल ला युथ फॉर रिवोलुशन या सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने महापुरुषांच्या जीवन कार्यावर आधारित प्रश्न मंजुषा आयोजित करण्यात आली. यामध्ये 63 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि विजेत्यांना रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली. यासाठी माजी विद्यार्थी संकेश रामराजे, सचिन तिरपुडे, राकेश मेश्राम, डॉ. अमोल मेंढे, डॉ. सुमेध नागदेवे, डॉ. सुशांत चिमणकर, प्रा. सिद्धार्थ वाणी यांनी जयंती सप्ताह यशस्वीते साठी विशेष परिश्रम घेतले.

हा जयंती सप्ताह आणि जागतिक ज्ञान दिन महाविद्यालयाच्या कार्यकारी प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे आणि सां स्कृतीक समिती समन्वयक डॉ. चंद्रशेखर पाटील यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आला.

## भावनिक हिंदोळ्याच्या पदराखाली विसावलेली 'आयुष्याची नवी पहाट': कवी साहेबराव मोरे




कवयित्री निशा खापरेंचा "आयुष्याची नवी पहाट" हा पहिला काव्यसंग्रह समीक्षणार्थ स्नेहपूर्वक पोहचला. पहिली कलाकृती असली तरी गतकालीन ओरखडे जपून वास्तवानुभ घेऊन अवतरलेली हि शब्दकळा आहे याची कबुली मनोगतात निशानी दिली आहे. माझ्या मनातील विचारशलाकेतील भावनोद्रेक निर्मळ करून, मायसखी होऊन कविता माझी पाठराखण करते. याच अर्थाने काव्य संग्रहाचे शीर्षक "आयुष्याची नवी पहाट " समर्पक असे आहे. पेपर वाचताना काहीतरी लिहिले पाहिजे अशी जाणीव मनात रूजली, हीच कवितेची उर्मी ठरली. मनातील आत्मियता, स्नेह, प्रेम, कुटुंब आणि घर संसार याविषयीचा भावबंध व्यक्त करताना अन् अस्तित्व खुणा जपताना ती व्यक्त होते,"अथांग अशा अस्तव्यस्त पसाऱ्याततळाला लागू नये आपले अस्तित्वम्हणून सावरते आहेहेलकावणाऱ्या त्या घडीला तोल" (जीवन नौका) आयुष्याच्या वळणावर आलेल्या भावनिक हिंदोळ्याच्या पदराखाली विसावलेली ही कविता आहे.निशाची कविता प्रगल्भ मनाची आहे याची प्रचिती अनेक कवितांमधून येते.शब्दातून कविता प्रसवते, पण शब्दकळा सोसून आलेली कविता माणसाचे बोट धरून, माणसांकडे पाठ फिरवणाऱ्या विकृती विरोधात उभी राहते.'अस्तित्वाच्या सुगंध ज्योती ' चा दरवळ हेच व्यक्त करतो,"नको अंतरी गर्व मानवानश्वरतेच्या या देहाचा,भान असू दे तुझ्या मनालाजगणे मरणे खेळ क्षणाचा,या जन्माला लाव सार्थकीकर्म चांगले निर्मळ करूनी,अंतरीचे उधळ चांदणेमाणुसकीला हृदयी जपुनी (पृ२८)कवयित्री निसर्ग सानिध्यात रमणारी आहे, शेतशिवाराच्या सहवासात अनुभवलेला हिरवाईचा चढविलेला शब्दसाज हे काव्याचे बलस्थान म्हणता येईल."सृष्टीचे रुप, पाऊस, श्रावण, सरी मृगाच्या, जीवनचक्र,भिजते काळी आई, श्रावणझुला,या कवितांचा नामोल्लेख या अनुषंगाने अटळ ठरतो. कवयित्री निशाची निसर्गातील रमनीयता व ती आशयघनता ताकतीने टिपण्याची निरिक्षण शक्ती, मांडणीचे कसब वाखाणण्याजोगी आहे. निसर्गचक्रात सजलेल्या धरतीचे विविध रुपे साकारली आहेत,"हिरवी रांगोळी / खुलून दिसतेशिवार नटते / श्रावणात" चल खेळूया मुक्त बागडू हिरव्या हिरव्या रानीइवल्या इवल्या पंखामधूनी ऐकू सुंदर गाणी" (सृष्टीचे रुप)"डोंगर झरते नदी वाहते पक्षी गाती गाणी शेतशिवारी पिके डोलती दरवळ पानोपानी" ( सरी मृगाच्या)जीवनाचे चिरसत्य अधोरेखित करणारी "जीवनचक्र "ही कविता , "मृग नक्षत्राचे येणे वैशाखाचे आहे देणे जीवनाचा असा खेळहेच ऋतूचे सांगणे"(८४)जीवन मृत्यूची अटळता ऋतूंच्या येण्याजाण्यातून होणाऱ्या बदलातून मानवी जीवनाला स्थायी परिणाम देते. स्त्रीजीवनाच्या वेदना दृगोचर करणाऱ्या कविता संग्रहाचे बलस्थान आहेत. प्रेम, विरह, शोषण, मातृत्व, वैवाहिक जीवन, संसार, अशा बहुअंगाने स्त्री विश्व चितारणात्या कविता निशा खापरेंच्या अनुशीलतेची प्रचीती देऊन जातात. "बाई जातीचे जीवनतळतळणारी राईजीव जळतो तरीही गाते सुखाची अंगाई" (बाईपण)राईची झिजण्याची उपमा म्हणजे अनुपम योजन नवरा- बायको या नात्यातील जबाबदारीची जाणीव व्यक्त करणारी एक दखलपात्र कविता! स्त्री मुक्ती चळवळीच्या उद्गात्या जिजाऊ, सावित्रीबाई फुले, जीवनाची आयुष्यातील प्रथमगुरू, मार्गदर्शक, असलेल्या आईला वंदन करणाऱ्या कविता समर्पणाचे प्रतिक आहेत. प्रत्येक माउलीमध्ये जिजाऊ, भीमाई ,क्रांतिज्योती शोधण्याचे काम करण्याचे आवाहन देखील आहे. मातेसमान जगात कुठलेही कृपाछत्र नाही, ती मुलांसाठी निरपेक्ष कल्पतरू असते आजच्या कठोर काळात एक स्त्री म्हणून लढणाऱ्या आईला आयुष्याची नवी पहाट हा पहिलाच संग्रह कवयित्रीने अर्पण केला आहे. "तिच्या घामाचा सुगंध" कवितेत निशा भावना व्यक्त करताना लिहिते, "संसाराच्या ठिगळालामाय जोडते प्रेमानेचिंध्या झालेल्या मनासपुन्हा सांधते कष्टाने"ही कविता बहुआयामी आहे अनेक विषयांवर चपखल भाष्य करते. 'कविता म्हणजे नुसता शब्दांचा मेळ नसून प्रतिभेची उत्कटता जपणारी मायेची पालवी असते ' ह्याची प्रचिती नक्कीच वाचताना येते .एकूण ९२ कविता संग्रहात आहेत. त्यातील काही गेय पूर्ण, तर काही वास्तववादी, व्यवस्था बदलांवर निष्ठा व्यक्त करणाऱ्या आहेत. बहुतेक कविता चार ओळींचे कडवे असणाऱ्या आहेत. अपवादात्मक दीर्घ कविता मुक्तछंद धाटणीची अनुभूती देतात. अनुभव व्यापकतेमुळे सर्वस्पर्शी काव्य फुलले आहे. हा काव्यसंग्रह जीवनानुभवातील भावविश्वाला अर्थघनता प्रदान करतो या अनुरोधाने आवर्जून वाचनीय आहे. ही साहित्यकृती पहिलीच असली तरी वाचकस्वीकृती नक्कीच मिळवेल, असा विश्वास ब्लर्बमध्ये प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' यांनी व्यक्त केला आहे, तो याच अर्थाने! माझे सन्मित्र डी. बी. जगत्पुरिया यांच्या चिकित्सक प्रस्तावनेत कवितेचे केलेले सर्वांगीण मूल्यमापन वाचकांना प्रेरणादायी आहे. काव्यप्रांतात आपले आगळेवेगळे स्थान निर्माण करणाऱ्या लेखनासाठी निशा खापरे यांना शुभेच्छा देतो!! चित्रकार अरविंद शेलार सरांनी आशयघन मुखपृष्ठ चितारले आहे. सुबक छपाई करणाऱ्या अविशा प्रकाशनाचा उल्लेख अपरिहार्यच!!!




**समीक्षण:- साहेबराव मोरे**
**(विद्रोही कवी)**
9404048601


काव्यसंग्रह: आयुष्याची नवी पहाट
कवयित्री: निशा खापरे
प्रकाशन: अविशा, नागपूर
मूल्य: ₹१६०/-


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103



जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ एप्रिल २०२६


## कासवा रे कासवा

कासवा रे कासवा
दिसतोस किती छान
ईकडे तिकडे बघतोस
डोकावून आपली मान

मजबूत तुझे कवच
शोभून दिसते पाठीवर
काळया काळया नक्षीची
त्यात पडते भर

छोट्या छोट्या पायांनी
डुलत डुलत चालतोस
संकटाची चाहूल लागता
कवचात लपून बसतोस

पाण्यातील जीवजंतू खाऊन
शुद्ध करतोस पाणी
स्वच्छतेचे महत्त्व
शिकविले तुला कुणी?

गर्विष्ठ सशाने एकदा
उचलला होता पैजेचा विडा
धावण्याची पैज जिंकून
सशाला शिकविलास धडा




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## शांतता करू नये भंग

शांतताप्रिय माणूस हा,
कमजोर कधीच नसतो.
योग्य वेळ येण्याची तो,
कायम वाट बघत बसतो. १

योग्य वेळ आल्यावर मात्र,
आपले खरे रूप दाखवितो.
वेळेला काबुत करून तो,
सर्वांना तालावर नाचवितो.२

शांतता प्रिय माणसाला,
कोणी समजू नये कमी.
परतफेड करण्याची तिथे,
शंभर टक्के असते हमी. ३

शांतता प्रिय माणसाची,
शांतता करू नये भंग.
नाहीतर जीवनभर तो,
करणार सर्वांनाच तंग. ४

शांतताप्रिय माणसाला,
शांतता आवडत असते.
एकदा पेटून उठल्यावर,
कशाचीच तमा नसते. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


## मागास घटकातील विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात समाऊन घेण्यासाठी युजीसी समानता कायद्याची अपरिहार्यता — ॲड. संघराज रुपवते



**छत्रपती संभाजीनगर :** उच्च शिक्षणातील भेदाभेद व अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शोषण व आत्महत्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या तरतुदीनुसार समानतेच्या कायद्याची निर्मिती करण्यात आली. त्यानुसार भारतीय संसदेने समितीची स्थापना करून समानतेचा कायदा बनवला व उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात समाऊन घेण्यासाठी युजीसी समानता कायद्याची अपरिहार्यता असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विधीतज्ञ एड संघराज रूपवते यांनी केले.महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक अध्ययन संस्थेच्या वतीने डॉ आर के क्षीरसागर स्मृती व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना एड.संघराज रुपवते हे बोलत होते. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक कार्याचा व विचारांचा आढावा घेऊन देशभरातील उच्च शिक्षणामध्ये जो भेदभाव होतो त्याच बरोबर अनेक विद्यार्थ्यांचे जाणून बुजून केलेले शोषण व व आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणारे वेगवेगळे घटक कारणीभूत आहेत. त्याचबरोबर रोहित वेमुला व पायल तडवी यांच्या घरच्यांनी ज्या काही वेगवेगळ्या केसेस सुप्रीम कोर्टामध्ये प्रलंबित आहेत. त्यापासून युजीसी समानता कायदा बनवण्याची सांगितले. परंतु, उच्चवर्णीयांनी या कायद्याचा मोठ्या प्रमाणावर विरोध केला आणि उच्चवर्णीयांवर अन्याय होतो की, काय? या माध्यमातून देशभर मोठे आंदोलन उभारले. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा या कायद्याचा दुरुपयोग होऊ शकतो अशी शक्यता बाळगून हा कायदा तात्पुरता बाजूला ठेवलेला आहे.त्यामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांवर अत्याचाराची मालिका मोठ्या प्रमाणात घडू शकते अशी खंत सुद्धा एड. संघराज रुपवते यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती प्राचार्य प्रमोद हेरोडे होते. त्यांनी पी एस सोसायटीच्या माध्यमातून मुलांना उच्च शिक्षण कसे दिले जात आहे याची माहिती दिली.अध्यक्षीय समारोप प्रा.श्रीकिशन मोरे यांनी केला. यावेळी देशातील उच्च शिक्षण हेच मागास वर्गात क्रांतीचे माध्यम असल्याचे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. संजय साळवे यांनी केले, तर, प्रास्ताविक व भूमिका डॉ. प्रज्ञा साळवे यांनी मांडली.

डॉ. दीपक क्षीरसागर व राजेश लोहगावकर यांनी मनोगत व्यक्त केली. आभार प्रदर्शन डॉ.गजानन आवचार यांनी केले. यावेळी डॉ. संजय मून, दीपक गायकवाड,बाबुराव बनसोडे, डॉ. संजय पाईकराव, डॉ.गजानन गजभिए, डॉ. धनराज गोंडाने व शहरातील गणमान्य व्यक्तींची उपस्थिती होती.

## बालवाटिका व इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत




**नाशिक रोड (प्रतिनिधी) :** शहरातील तोफखाना केंद्र परिसरातील पीएमश्री केंद्रीय विद्यालय नासिक रोड कॅम्प येथे बालवाटिका व इयत्ता पहिलीच्या नवागत विद्यार्थ्यांसाठी 'प्रवेशोत्सव' सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. शाळेचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि संपूर्ण विद्यालय परिवाराच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने झाली. लहान विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, खेळ आणि आनंददायी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दल उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी प्राचार्य गजराज मीना यांनी पालकांचे मुलांच्या प्रवेशाबद्दल अभिनंदन केले. त्यांना नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल मार्गदर्शन केले. 'निपुण भारत ' आणि मूलभूत साक्षरता व अंकज्ञान यांसारख्या उपक्रमांची त्यांनी माहिती दिली. मुख्याध्यापक अविनाश पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यात आनंदी वातावरणाचे महत्त्व अधोरेखित केले. शाळेच्या आतापर्यंतच्या शैक्षणिक प्रवासावर संक्षिप्त प्रकाश टाकला. अंजली सक्सेना, वैशाली हुडा, स्वाती सोनुले, या शिक्षिकांनी सूत्र संचलन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आविष्कार धिवरे, आरीफ बेग, सागर काठोळे, महादेव इघारे, अर्चना काळे, मनीषा माळे आदींनी परिश्रम घेतले. पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. मुलांच्या प्रवेशाबद्दल सर्व पालकांनी प्राचार्य व शिक्षकांना धन्यवाद दिले. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला असून, नवागत विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनाची सुरुवात उत्साहपूर्ण झाली आहे, असे मनोगत पालकांकडून व्यक्त करण्यात आले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २१ एप्रिल २०२६

# अभ्यासक्रमाविना परीक्षा: उपवर्गीकरणाच्या नावाखाली लोकशाहीची कसोटी

**म**हाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा सध्या राज्याच्या सामाजिक आणि राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने दिनांक १६ मार्च २०२६ रोजी शासनाला आपला अहवाल सादर केला. त्यानंतर दि. १० एप्रिल २०२६ रोजी शासन निर्णयाद्वारे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली या शासन निर्णयाद्वारे अहवालावर जनतेकडून आक्षेप, मते आणि निवेदने मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. इच्छुकांना ई-मेलद्वारे नोंदणी करून आपले अभिप्राय सादर करण्याची मुदत सुरुवातीला १५ एप्रिल २०२६ पर्यंत देण्यात आली होती, जी नंतर आणि दि. १३ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रेस नोटद्वारे वाढवून ३० एप्रिल २०२६ करण्यात आली. या सर्व प्रक्रियेचा वरकरणी हेतू लोकशाही पद्धतीने जनमत जाणून घेणे असा दिसत असला, तरी प्रत्यक्षात या प्रक्रियेतील अनेक विसंगती आणि विरोधाभास समोर येतात.सर्वात मूलभूत आणि गंभीर प्रश्न असा आहे की, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविली जात आहेत, तो अहवालच जर सार्वजनिक केला गेला नसेल, तर सामान्य नागरिकांनी नक्की काय वाचून, काय समजून आणि कोणत्या आधारावर आपले मत व्यक्त करायचे? ही परिस्थिती अक्षरशः “अभ्यासक्रमाशिवाय परीक्षा देण्यासारखी” आहे. ज्यांना ‘अ ब क ड’ काय आहे हेच माहीत नाही, त्यांनी त्या परीक्षेत उत्तरे लिहायची कशी? हा प्रश्न केवळ उपरोधिक नाही, तर तो लोकशाही प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह उभा करणारा आहे. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही धोरणात्मक निर्णयासाठी जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो, परंतु तो सहभाग अर्थपूर्ण आणि माहितीपूर्ण असला पाहिजे. माहितीच उपलब्ध नसेल, तर सहभाग केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहतो. या संदर्भात पाहिले तर, अहवाल सार्वजनिक न करता मते मागविण्याची प्रक्रिया ही केवळ ‘लोकशाहीचा आव आणणारी’ ठरते, प्रत्यक्षात ती लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणणारी आहे.विशेषतः, महाराष्ट्रातील अनुसूचित जातींमधील मोठा वर्ग हा अजूनही सामाजिक-आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आणि माहितीच्या अभावामुळे वंचित आहे. अशा परिस्थितीत ई-मेलद्वारे मते मागविण्याची अट ही स्वतःमध्येच भेदभाव करणारी ठरते. ग्रामीण भागातील, डिजिटल साधनसंपत्ती नसलेल्या किंवा संगणक साक्षरता नसलेल्या व्यक्तींना या प्रक्रियेत सहभागी होणे जवळजवळ अशक्यच आहे. म्हणजेच, ज्या घटकांवर या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम होणार आहे, त्यांनाच या प्रक्रियेपासून दूर ठेवले जात आहे. यातून एक मोठा विरोधाभास समोर येतो की सामाजिक न्यायाच्या नावाखाली राबविण्यात येणारी प्रक्रिया प्रत्यक्षात सामाजिक अन्याय वाढविणारी ठरत आहे. उपवर्गीकरणाचा उद्देश जर अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता कमी करणे हा असेल, तर त्या विषमतेची अचूक ओळख आणि त्यावर आधारित उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु अहवालाची माहितीच उपलब्ध नसताना, या विषमतेचे स्वरूप काय आहे, त्याची कारणे काय आहेत आणि प्रस्तावित उपाययोजना कोणत्या आहेत, हेच समजत नसल्याने, संपूर्ण प्रक्रिया अस्पष्ट आणि संशयास्पद वाटू लागते.शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती ही तीन वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची आहे. या समितीमध्ये समाजशास्त्रज्ञ, तज्ज्ञ किंवा अनुसूचित जातींचे प्रतिनिधी नसल्याने, या प्रक्रियेतील ‘प्रतिनिधित्वाचा अभाव’ प्रकर्षाने जाणवतो. जे लोक या निर्णयामुळे थेट प्रभावित होणार आहेत, त्यांचा आवाज या समितीत प्रतिबिंबित होत नाही, ही बाब चिंताजनक आहे. याशिवाय, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविण्यासाठी पाच-सहा दिवस आणि सुनावणीसाठी सुरुवातीला केवळ दोन दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, ही बाबही लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने अपुरी आणि असमाधानकारक आहे. जरी नंतर मुदत वाढविण्यात आली असली, तरी सुरुवातीचा निर्णय हा घाईघाईत आणि अपुऱ्या तयारीत घेतल्याचे स्पष्ट होते. इतक्या महत्त्वाच्या विषयावर व्यापक चर्चा, जनजागृती आणि संवाद आवश्यक असतो, जो येथे दिसून येत नाही.अहवाल सार्वजनिक न करण्यामागील कारणे काय असू शकतात, हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. जर अहवालात मांडलेली माहिती, आकडेवारी आणि शिफारसी या वैज्ञानिक आणि तर्कसंगत असतील, तर त्या सार्वजनिक करण्यास काय हरकत आहे? उलट, पारदर्शकतेमुळे जनतेचा विश्वास वाढतो आणि निर्णय प्रक्रियेची वैधता अधिक दृढ होते. परंतु अहवाल गुप्त ठेवून मते मागविणे ही पद्धत संशय निर्माण करणारी ठरते. या संपूर्ण प्रक्रियेकडे पाहिले असता, असे वाटते की, उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ सामाजिक न्यायाचा नसून, तो राजकीय आणि प्रशासकीय अजेंड्याचाही भाग असू शकतो. अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत विभागणी निर्माण करणे, त्यांच्यात स्पर्धा वाढविणे आणि त्यातून राजकीय लाभ मिळविणे, हा एक संभाव्य हेतू असू शकतो, अशी शंका निर्माण होते. अशा परिस्थितीत, समाजातील एकात्मता आणि बंधुता धोक्यात येऊ शकते.उपवर्गीकरणाच्या माध्यमातून काही जातींना अधिक लाभ देण्याचा प्रयत्न केला गेला, तर इतर जातींमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. यामुळे सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता आहे. सामाजिक न्यायाच्या नावाखाली जर नव्या प्रकारची विषमता निर्माण होत असेल, तर त्या धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते. याशिवाय, या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, प्रतिनिधित्वाचा अभाव, आणि सर्वसमावेशकतेचा अभाव हे तीन मोठे दोष स्पष्टपणे दिसून येतात. हे दोष दूर केल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे म्हणजे समाजावर प्रयोग करण्यासारखे आहे. आणि समाजावर केलेले असे प्रयोग दीर्घकालीन दृष्टीने हानिकारक ठरू शकतात. म्हणूनच, शासनाने या संपूर्ण प्रक्रियेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे, त्यावर व्यापक चर्चा घडवून आणणे, विविध स्तरांवरील प्रतिनिधींना सहभागी करून घेणे आणि त्यानंतरच कोणताही निर्णय घेणे, हीच योग्य दिशा ठरू शकते. अन्यथा, हा निर्णय सामाजिक न्यायाच्या नावाखाली सामाजिक विषमता वाढविणारा ठरू शकतो.या प्रश्नाकडे अधिक सखोलपणे घटनात्मक तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि व्यापक सामाजिक परिणाम या तिन्ही अंगांनी पाहणे आवश्यक ठरते. कारण कोणतेही आरक्षण धोरण हे केवळ प्रशासकीय निर्णय नसून ते भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत मूल्यांशी आणि न्यायव्यवस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी जोडलेले असते. भारतीय राज्यघटनेने समानतेचे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे मानले आहे. अनुच्छेद १४ सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता देतो, तर अनुच्छेद १५(४) आणि १६(४) या विशेष तरतुदींमधून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना विशेष उपाययोजना म्हणजेच आरक्षण देण्याची मुभा राज्याला दिली आहे. या तरतुदींचा उद्देश केवळ समानतेचा औपचारिक अधिकार देणे नसून, ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या घटकांना प्रत्यक्षात संधींची समानता मिळवून देणे हा आहे. म्हणूनच आरक्षण ही संकल्पना ‘समानतेतील असमानता’ स्वीकारून ‘खऱ्या समानतेकडे’ नेणारी उपाययोजना मानली जाते. याच पार्श्वभूमीवर अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा ठरतो. एकीकडे, राज्यघटना राज्याला मागासलेल्या घटकांसाठी विशेष उपाययोजना करण्याची मुभा देते; परंतु दुसरीकडे, त्या उपाययोजनांमुळे त्या गटामध्येच नव्या प्रकारची विषमता निर्माण होऊ नये, ही देखील एक महत्त्वाची अट आहे. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून अनुसूचित जातींमध्येच ‘अधिक मागास’ आणि ‘कमी मागास’ अशा प्रकारची विभागणी केली जाते, ज्यामुळे मूलभूत एकात्मतेला तडा जाऊ शकतो.या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे काही महत्त्वाचे निर्णय लक्षात घेणे आवश्यक आहे. काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने उपवर्गीकरणाला तत्त्वतः मान्यता दिली आहे, परंतु त्यासाठी अत्यंत कठोर अटी घातल्या आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, उपवर्गीकरण केवळ तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ आणि पुराव्यांवर आधारित असले पाहिजे. केवळ राजकीय किंवा प्रशासकीय सोयीसाठी असे विभाजन करता येणार नाही. याशिवाय, अशा उपवर्गीकरणामुळे कोणत्याही गटावर अन्याय होणार नाही, याची खात्री करणेही आवश्यक आहे. मात्र, येथेच एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की महाराष्ट्रातील या प्रक्रियेत अशा प्रकारचा वैज्ञानिक आणि पारदर्शक आधार कितपत उपलब्ध आहे? न्यायमूर्ती बदर समितीने सादर केलेला अहवाल सार्वजनिकच करण्यात आलेला नसल्याने, त्यातील आकडेवारी, विश्लेषण आणि शिफारसी यांचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करणे अशक्य झाले आहे. न्यायालयाने अपेक्षित केलेली ‘वस्तुनिष्ठता’ आणि ‘पारदर्शकता’ या दोन्ही बाबी येथे प्रश्नचिन्हाखाली येतात. घटनात्मक दृष्टिकोनातून पाहिले असता, ही प्रक्रिया ‘नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वां’शीही विसंगत ठरू शकते. नैसर्गिक न्यायाचा एक मूलभूत सिद्धांत असा आहे की, कोणत्याही निर्णयाचा परिणाम ज्यांच्यावर होणार आहे, त्यांना त्या निर्णयाच्या आधारभूत माहितीची पूर्ण जाणीव असली पाहिजे आणि त्यांना आपले मत मांडण्याची संधी दिली पाहिजे. परंतु येथे परिस्थिती उलट आहे. माहिती न देता मत मागविणे. त्यामुळे ही प्रक्रिया ‘ऐकले जाण्याचा हक्क’ (Right to be heard) या तत्त्वालाच बाधा आणणारी ठरते.याशिवाय, या प्रक्रियेत ‘समतोल प्रतिनिधित्वा’चा अभावही स्पष्ट दिसून येतो. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती ही प्रामुख्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांची आहे. समाजशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, मानवाधिकार कार्यकर्ते किंवा अनुसूचित जातींचे प्रतिनिधी यांचा या समितीत समावेश नसल्याने, निर्णय प्रक्रियेत विविध दृष्टिकोनांचा अभाव जाणवतो. लोकशाहीत विविधतेचा सन्मान करणे अत्यावश्यक असते; परंतु येथे एकसुरी प्रशासकीय दृष्टिकोन प्राधान्याने दिसतो. सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले असता, उपवर्गीकरणाचे परिणाम अधिक गंभीर ठरू शकतात. अनुसूचित जाती हा गट आधीच सामाजिकदृष्ट्या वंचित आणि उपेक्षित आहे. या गटामध्येच आणखी विभागणी केल्यास अंतर्गत तणाव वाढण्याची शक्यता आहे. काही जातींना अधिक लाभ मिळाल्याची भावना निर्माण झाल्यास, इतर जातींमध्ये असंतोष आणि उपेक्षा वाढू शकते. यामुळे सामाजिक एकात्मतेला धक्का बसू शकतो. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, उपवर्गीकरणामुळे ‘वंचितांमध्ये स्पर्धा’ वाढण्याचा धोका आहे. जे घटक आधीच मर्यादित संसाधनांसाठी झगडत आहेत, त्यांच्यातच स्पर्धा निर्माण झाल्यास, व्यापक सामाजिक न्यायाचा उद्देशच मागे पडतो. अशा परिस्थितीत, राज्याची भूमिका ‘समावेशक विकास’ घडवून आणण्याची असताना, ती नकळत ‘विभाजन’ घडवून आणणारी ठरू शकते.डिजिटल माध्यमांवर आधारित मते मागविण्याची प्रक्रिया या समस्येला आणखी तीव्र करते. शहरी, सुशिक्षित आणि संसाधनसंपन्न घटकांना या प्रक्रियेत सहभागी होणे सोपे जाते; परंतु ग्रामीण, अशिक्षित आणि उपेक्षित घटक या प्रक्रियेपासून दूर राहतात. यामुळे धोरण तयार करताना एका विशिष्ट वर्गाचे मत अधिक प्रमाणात प्रतिबिंबित होण्याची शक्यता असते. ही बाब ‘समावेशक लोकशाही’च्या तत्त्वांशी विसंगत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पाहिले असता, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत अनेक पातळ्यांवर गंभीर प्रश्न निर्माण होतात. घटनात्मक वैधता, न्यायालयीन निकष, नैसर्गिक न्याय, प्रतिनिधित्व आणि सामाजिक परिणाम. या सर्व बाबींचा सखोल विचार केल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे धोकादायक ठरू शकते.म्हणूनच, शासनाने या प्रक्रियेचा पुनर्विचार करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम, संबंधित अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे, त्यावर व्यापक आणि माहितीपूर्ण चर्चा घडवून आणणे, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ आणि प्रतिनिधींना सहभागी करून घेणे, आणि त्यानंतरच कोणताही अंतिम निर्णय घेणे, हीच योग्य दिशा ठरू शकते. अन्यथा, उपवर्गीकरणाच्या नावाखाली घेतलेले निर्णय हे सामाजिक न्यायाला बळकटी देण्याऐवजी नव्या प्रकारच्या विषमतेला जन्म देऊ शकतात. या संदर्भात एक गोष्ट स्पष्ट आहे की लोकशाही ही केवळ निर्णय घेण्याची प्रक्रिया नाही, तर ती विश्वास निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. आणि हा विश्वास केवळ पारदर्शकता, समावेशकता आणि न्याय्यतेच्या आधारावरच निर्माण होतो. जर या तत्त्वांकडे दुर्लक्ष झाले, तर “अभ्यासक्रमाविना परीक्षा” ही केवळ उपमा न राहता लोकशाहीच्या अपयशाचे प्रतीक ठरू शकते.या प्रश्नाचे आर्थिक, राजकीय आणि धोरणात्मक परिणाम अधिक स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक ठरते. कारण कोणतेही आरक्षण धोरण हे केवळ सामाजिक समतोलासाठी नसून, ते आर्थिक संधींच्या पुनर्वाटपाशी आणि राजकीय सत्तासंतुलनाशीही निगडित असते. त्यामुळे या प्रक्रियेचे दूरगामी परिणाम काय असू शकतात, याचा सखोल विचार करणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम आर्थिक परिणामांकडे पाहिले, तर अनुसूचित जातींना मिळणाऱ्या आरक्षणाच्या संधी शिक्षण, नोकऱ्या, शिष्यवृत्ती, विविध कल्याणकारी योजना या आधीच मर्यादित आहेत. या मर्यादित संसाधनांमध्ये उपवर्गीकरण केल्यास त्याचे विभाजन आणखी सूक्ष्म पातळीवर होईल. परिणामी, काही जातींना अधिक लाभ मिळू शकतो, परंतु इतर जातींच्या संधी कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे ‘संधींची समानता’ साधण्याऐवजी ‘संधींचे पुनर्वाटप’ अधिक असमतोल स्वरूपात होण्याचा धोका निर्माण होतो. विशेषतः, ज्या जाती आधीच काही प्रमाणात पुढे आलेल्या आहेत, त्यांना अधिक लाभ मिळाल्यास खऱ्या अर्थाने वंचित घटक पुन्हा मागे पडू शकतात. याशिवाय, उपवर्गीकरणामुळे शैक्षणिक आणि रोजगाराच्या क्षेत्रात स्पर्धेचे स्वरूप बदलू शकते. एकाच गटामध्ये वेगवेगळ्या उपगटांमध्ये स्पर्धा निर्माण झाल्यास, एकूणच सामाजिक उन्नतीचा वेग कमी होण्याची शक्यता आहे. कारण संसाधनांसाठी होणारी ही अंतर्गत स्पर्धा एकात्मिक प्रगतीऐवजी विखुरलेली प्रगती घडवून आणते. दीर्घकालीन दृष्टीने पाहिले असता, हे आर्थिक सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला बाधा आणणारे ठरू शकते. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले असता, उपवर्गीकरणाचा प्रश्न अधिक संवेदनशील ठरतो. अनुसूचित जाती हा गट राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. या गटामध्ये उपविभागणी केल्यास, विविध जातींमध्ये वेगवेगळे राजकीय हितसंबंध निर्माण होऊ शकतात. यामुळे राजकीय पक्षांना विशिष्ट उपगटांना लक्ष्य करून धोरणे आखण्याची संधी मिळते. ही प्रक्रिया दीर्घकालीन दृष्टीने ‘विभाजित राजकारणा’ला चालना देऊ शकते. सामाजिक एकात्मतेच्या ऐवजी ‘ओळख-आधारित राजकारण’ अधिक बळकट होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. याच संदर्भात, उपवर्गीकरणामुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. जेव्हा एका गटामध्येच ‘अधिक पात्र’ आणि ‘कमी पात्र’ अशा प्रकारची विभागणी केली जाते, तेव्हा परस्परांमध्ये अविश्वास निर्माण होतो. सामाजिक न्यायाच्या नावाखाली जर अंतर्गत संघर्ष वाढत असेल, तर त्या प्रक्रियेचा पुनर्विचार करणे अत्यावश्यक ठरते. कारण सामाजिक न्यायाचा खरा उद्देश हा समाजात बंधुता आणि एकात्मता वाढविणे हा आहे, विभागणी करणे नव्हे.या सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी काही ठोस उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे ही अत्यंत मूलभूत गरज आहे. अहवालातील आकडेवारी, विश्लेषण आणि शिफारसी जनतेसमोर मांडल्याशिवाय कोणतीही चर्चा अर्थपूर्ण ठरू शकत नाही. पारदर्शकता ही विश्वासाची पायाभूत अट आहे, आणि ती पूर्ण केल्याशिवाय लोकशाही प्रक्रियेची वैधता निर्माण होऊ शकत नाही. दुसरे म्हणजे, मते आणि आक्षेप नोंदविण्याची प्रक्रिया अधिक सर्वसमावेशक करणे आवश्यक आहे. केवळ ई-मेलपुरती मर्यादित न ठेवता, जिल्हास्तरावर सार्वजनिक सुनावण्या, ग्रामसभांमधून चर्चा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून अभिप्राय गोळा करणे, अशा विविध माध्यमांचा वापर करणे गरजेचे आहे. यामुळे ग्रामीण आणि उपेक्षित घटकांनाही आपले मत मांडण्याची संधी मिळेल. तिसरे म्हणजे, समितीच्या संरचनेत विविधता आणणे आवश्यक आहे. समाजशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, अनुसूचित जातींचे प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी आणि नागरी समाजातील तज्ज्ञ यांचा समावेश केल्यास निर्णय प्रक्रिया अधिक समतोल आणि वास्तवाधारित होऊ शकते. केवळ प्रशासकीय दृष्टिकोनावर आधारित निर्णय घेणे हे अपुरे ठरते. चौथे म्हणजे, उपवर्गीकरणाचा निर्णय घेताना ‘डेटा-आधारित धोरण’ (evidence-based policy) स्वीकारणे अत्यावश्यक आहे. कोणत्या जाती खरोखरच अधिक मागास आहेत, त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती काय आहे, त्यांना मिळालेल्या संधींचे वितरण कसे आहे. या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. अन्यथा, उपवर्गीकरण हे केवळ अनुमानांवर आधारित ठरेल, जे दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकते. पाचवे म्हणजे, या संपूर्ण प्रक्रियेत जनजागृतीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीतील नागरिकांना त्यांच्या हक्कांबद्दल, प्रस्तावित बदलांबद्दल आणि त्याच्या परिणामांबद्दल माहिती देणे ही शासनाची जबाबदारी आहे. माहितीशिवाय सहभाग हा केवळ औपचारिक राहतो, आणि औपचारिक सहभागातून न्याय्य निर्णय घडत नाहीत.या सर्व उपाययोजनांचा विचार केला, तर एक गोष्ट स्पष्ट होते की उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ ‘आरक्षणाचे तांत्रिक पुनर्वाटप’ नाही, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वांची कसोटी आहे. जर ही प्रक्रिया पारदर्शक, समावेशक आणि न्याय्य पद्धतीने राबवली गेली, तर ती खऱ्या अर्थाने वंचित घटकांना न्याय देऊ शकते. परंतु जर ती घाईघाईत, अपारदर्शक आणि मर्यादित सहभागावर आधारित असेल, तर ती नव्या विषमतेला जन्म देऊ शकते.शेवटी, “अभ्यासक्रमाविना परीक्षा” ही उपमा केवळ भाषिक अलंकार नसून, ती या संपूर्ण प्रक्रियेचे वास्तव प्रतिबिंब आहे. जेव्हा नागरिकांना माहिती न देता त्यांच्याकडून मते मागविली जातात, तेव्हा ती लोकशाही प्रक्रिया न राहता केवळ औपचारिकता ठरते. आणि जेव्हा लोकशाही औपचारिकतेपुरती मर्यादित राहते, तेव्हा तिच्या समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूळ तत्त्वांना धक्का बसतो. म्हणूनच, आज गरज आहे ती केवळ निर्णय घेण्याची नाही, तर योग्य पद्धतीने निर्णय घेण्याची. पारदर्शकता, समावेशकता आणि न्याय्यतेच्या आधारावरच कोणतेही धोरण समाजासाठी हितकारक ठरू शकते. अन्यथा, सामाजिक न्यायाच्या नावाखालीच सामाजिक विषमता वाढण्याचा धोका निर्माण होतो. आणि हीच बाब या संपूर्ण प्रक्रियेबाबत सर्वात मोठी चिंता निर्माण करणारी ठरते.

**ॲड. सुनिल बगाटे,**
(विधिज्ञ, मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर) ईमेल – dhirajbagate@gmail.com
**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल – bagate.rajendra5@gmail.com